महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ,नाशिक
MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES, NASHIK
दिंडोरी रोड, म्हसरुळ, नाशिक-४२२००४ Dindori Road, Mhasrul, Nashik-422004
EPABX: 0253-2539100/300, Fax: 0253 - 2539223, Ph.: 2539118/212/214, 6659118/212/214
MUHS Email: coe@muhs.ac.in preexam@muhs.ac.in Website: www.muhs.ac.in

डॉ. अजित गजानन पाठक
एम.बी.बी.एस, एम.डी.(न्यायवैद्यकशास्त्र),
परीक्षा नियंत्रक

Dr. Ajit Gajanan Pathak
M.B.B.S., M.D.(Forensic Medicine)
Controller of Examinations

जा.क्र. :मआविवि/एक्सपी- १/ ९३ /२०१९ दि.:२८ /०१/२०१९

परिपत्रक क्र. : ०४/२०१९

प्रति,
अधिष्ठाता/प्राचार्य/संचालक,
विद्यापीठ संलग्नित सर्व महाविद्यालये/संस्था,
मआविवि, नाशिक.

**विषय :-** **उन्हाळी - २०१९ विद्यापीठ परीक्षेपासून परीक्षार्थी विद्यार्थी/ विद्यार्थीनी यांना परीक्षा केंद्रावर परिधान करावयाच्या पोषाख/ पेहराव (Dress Code) बाबत...**

**संदर्भ :-** १) परीक्षा विभागाचे पत्र क्रं. मआविवि/एक्सपी-१/२०२६/२०१८ दि.३१/१०/२०१८.
२) परीक्षा मंडळ बैठक दि. २०/१२/२०१८ ठराव क्र. ५२/२०१८

महोदय/ महोदया,

आरोग्य विज्ञान शाखेच्या अभ्यासक्रमाच्या परीक्षार्थी विद्यार्थी/विद्यार्थीनी यांनी परीक्षा केंद्रावर परीधान करावयाच्या पोषाख/ पेहराव (Dress Code) बाबत विद्यापीठ विद्यापरिषदेने निर्धारीत केलेली नियमावली संदर्भ क्रं. १ अन्वये निर्गमीत केली होती.

तसेच, परीक्षा केंद्रावर सांस्कृतिक/पारंपारिक (Cultural/Traditional) पोषाख परीधान करण्याबाबतच्या विषयानुषंगाने सदर नियमावलीमध्ये विद्यापीठ उन्हाळी - २०१९ परीक्षेपासून खालील मुद्याचा अंर्तभाव करण्यासाठी मला प्राप्त आदेशान्वये कळविण्यात येत आहे.

*"ज्या विद्यार्थ्यांना सांस्कृतिक / पारंपरिक पोशाख परिधान करावयाचा असल्यास व ज्यांनी **परीक्षा अर्ज भरतांना सदर पोशाख परिधान करावयाचा पर्याय निवडला असेल;** त्यांनी परीक्षेच्या विहीत वेळेच्या एक तास अगोदर परीक्षा केंद्रावर पोशाख तपासणीसाठी हजर रहावे. तसेच परीक्षा अर्ज भरतांना संबंधित विद्यार्थी/विद्यार्थीनी मार्फत चिकटविण्यात आलेले छायाचित्र व परीक्षा अर्जावरील स्वाक्षरी, संबंधित विद्यार्थी/विद्यार्थीनीच्या प्रवेशपत्रावरील (Hall Ticket) माहिती एकसमान/साम्य असावी. सर्व परीक्षार्थी यांनी पोशाख तपासणीच्या वेळी संबंधित शिक्षक/अधिकारी/कर्मचारी यांना सहकार्य करावे.*

*However, in case examinee wants to come in Cultural/ Traditional Dress at the examination centre; **and who have given the option of Cultural / Traditional Dress code in Examination form while filling it;** should report at least an hour before the scheduled examination time so that, there is enough time for proper frisking without any inconvenience to the examinee while maintaining the sanctity of the examinations. Also it should be ensured that the Photograph and Signature in an Examination Form must match with that of Hall Ticket."*

त्याअनुषंगाने, सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, उन्हाळी-२०१९ परीक्षेपासून ज्या परीक्षार्थीना परीक्षेच्या वेळी सांस्कृतिक / पारंपरिक (Cultural/Traditional) पोशाख परिधान करावयाचा असल्यास, त्यांनी परीक्षा अर्ज भरतांना सदर पोशाख परिधान करावयाचा पर्याय निवडून परीक्षेच्या विहीत वेळेच्या एक तास अगोदर परीक्षा केंद्रावर पोशाख तपासणीसाठी हजर रहाणे अनिवार्य आहे. सदर पोशाख तपासणीकरिता एक तास अगोदर उपस्थित न राहिल्यास संबंधित परीक्षार्थीस परीक्षेकरिता होणा-या विलंबास संबंधित परीक्षार्थी जबाबदार असेल याची नोंद घ्यावी.

तसेच, परीक्षा अर्ज भरताना सांस्कृतिक/पारंपारिक (Cultural/Traditional) पोषाख परीधान करायचा पर्याय निवडला नसेल तर संदर्भाकीत विद्यापीठ नियमानुसार परीक्षेच्या कालावधी दरम्यान परीक्षा केंद्रावर परीधान करावयाचा पोषाख/पेहराव (Dress Code) परीधान करणे अनिवार्य असेल व त्यात कोणताही बदल केला जाणार नाही. सदर पर्याय निवडला नसेल तर सांस्कृतिक/पारंपारिक (Cultural/Traditional) पोषाख परीधान करुन परीक्षेस बसू दिले जाणार नाही याची नोंद घेण्याबाबत सर्व परीक्षार्थींना सुचित करावे.

करिता, सर्व संबंधितांनी उक्तप्रमाणे नोंद घेवून, सदर बाब महाविद्यालयाच्या सूचना फलकावर (Notice Board) ठळक प्रदर्शित करुन, सर्व विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणावी. तसेच याबाबत भविष्यात काही बाबी उद्भवल्यास त्याकरिता संबंधित महाविद्यालय जबाबदार राहील, याची नोंद घ्यावी.

सर्व संबंधितांच्या सुलभ संदर्भासाठी विद्यापीठ परीक्षेदरम्यान पोषाख/पेहरावाबाबतची (Dress Code) नियमावली सोबत जोडली आहे.

**(डॉ. अजित गजानन पाठक)**
**परीक्षा नियंत्रक**

**सोबत : वरीलप्रमाणे**